महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४६ वा | दिनांक : ०४/०३/२०२५ | वार : मंगळवार

## तामिळनाडूच्या लोकांनी लवकर मुले जन्माला घालावी : अन्यथा आपण ८ खासदार गमावू - मुख्यमंत्री स्टॅलिन



**चेन्नई** : तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी राज्यातील लोकांना लवकरात लवकर मुले होऊ देण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले- पूर्वी आपण म्हणायचो की, फुरसतीनुसार मुले जन्माला घाला, पण आता परिस्थिती बदलली आहे, त्यामुळे त्वरित मुले जन्माला घालण्याची गरज आहे.

राज्यातील लोकसंख्येवर आधारित सीमांकनामुळे, राज्यातील लोकसभेच्या जागांची संख्या कमी होऊ शकते, ज्यामुळे राज्याचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होईल. तामिळनाडूचे यशस्वी कुटुंब नियोजन धोरण आता राज्यासाठी हानिकारक ठरत आहे.

तामिळनाडूच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी स्टॅलिन यांनी ५ मार्च रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. त्यांनी सर्व विरोधी पक्षांना सामील होण्याचे आवाहन केले आणि सांगितले की आपल्याला या मुद्द्यावर एकत्र यावे लागेल आणि आपल्या हक्कांचे रक्षण करावे लागेल.

खरंतर, स्टॅलिन सोमवारी नागापट्टिनम जिल्ह्याच्या पक्ष सचिवाच्या लग्नाच्या वर्धापनदिनानिमित्त उपस्थित राहण्यासाठी आले होते. येथेच त्यांनी राज्यातील लोकांना अधिक मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले.

२५ फेब्रुवारी रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर बोलताना स्टॅलिन यांनी असेही जोर दिला होता की तामिळनाडूमध्ये कुटुंब नियोजन धोरण यशस्वीरित्या अंमलात आणल्यानंतर, राज्य आता तोट्यात आहे. जर लोकसंख्या जनगणनेच्या आधारे सीमांकन लागू केले तर तामिळनाडूचे आठ खासदार गमवावे लागतील. यामुळे संसदेत तामिळनाडूचे प्रतिनिधित्व कमी होईल.

सीमांकन म्हणजे लोकसभा आणि विधानसभा जागांच्या सीमा निश्चित करण्याची प्रक्रिया. सीमांकनासाठी एक आयोग स्थापन केला जातो. यापूर्वी १९५२, १९६३, १९७३ आणि २००२ मध्येही आयोग स्थापन करण्यात आले आहेत.

लोकसभेच्या जागांसाठी सीमांकन प्रक्रिया २०२६ पासून सुरू होईल. अशा परिस्थितीत २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ७८ जागा वाढण्याची शक्यता आहे. दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्येवर आधारित सीमांकनाला विरोध केला आहे. म्हणून, सरकार प्रमाणबद्ध सीमांकनाकडे वाटचाल करेल, ज्यामध्ये लोकसंख्या संतुलन राखण्यासाठी एक चौकट तयार केली जात आहे.

सरकारने सीमांकन आयोगासमोरील चौकटीवर काम सुरू केले आहे. प्रतिनिधित्वाबाबतच्या विद्यमान व्यवस्थेत छेडछाड केली जाणार नाही, उलट लोकसंख्याशास्त्रीय संतुलन लक्षात घेऊन एक व्यापक चौकट तयार करण्याचा विचार केला जात आहे.

तामिळनाडू-पुदुच्चेरीमध्ये लोकसभेच्या ४० जागा आहेत. जर उत्तर प्रदेशातील सध्याच्या ८० जागांमधून १४ जागा वाढवल्या तर त्यातील निम्मी म्हणजे तामिळनाडू-पुदुचेरीतील ७ जागा वाढवणे म्हणजे प्रमाणशीर प्रतिनिधित्व होय. म्हणजेच, जागा वाढवण्यासाठी लोकसंख्या हा एकमेव पर्याय नाही.

लोकसंख्येच्या आधारावर हिंदी पट्ट्यात जितक्या जागा वाढतील तितक्याच प्रमाणात लोकसंख्या नियंत्रित करणाऱ्या राज्यांमध्येही जागा वाढतील. एका लोकसभेत २० लाख लोकसंख्येसाठी एक खासदार असेल, तर दुसऱ्या ठिकाणी १०-१२ लाख लोकसंख्येसाठी एक खासदार असेल.

देशातील ८५ लोकसभा जागांमध्ये अल्पसंख्याकांची लोकसंख्या २०% ते ९७% पर्यंत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या जागांवर लोकसंख्याशास्त्रीय संतुलन राखण्यासाठी लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली जाऊ शकते.

१९७७ पासून लोकसभेच्या जागांची संख्या गोठवण्यात आली होती, परंतु आता महिलांना ३३ टक्के आरक्षण दिल्यानंतर, ती डीफ्रॉस्ट करणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढीचा दर प्रभावीपणे नियंत्रित करणाऱ्या राज्यांनी या आधारावर त्यांच्या जागांमध्ये कोणत्याही कपातीला विरोध करण्याचा इशारा दिला आहे.

## मनोज जरांगे पाटील यांची तब्येत अचानक बिघडली



**छत्रपती संभाजीनगर** : मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची तब्येत अचानक बिघडली आहे. संभाजीनगरच्या एका खासगी रुग्णालयात ॲडमिट करण्यात आले आहे. यापूर्वीही त्यांच्यावर संभाजीनगरमधील खासगी रुग्णालयातच उपचार करण्यात आले आहेत.

आंतरवाली सराटीमध्ये आज सकाळी काही कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांना भेटण्यासाठी दाखल झाले. यावेळी जरांगे पाटील यांना त्यांच्यासमोरच भोवळ आली. या कार्यकर्त्यांनी त्यांना छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल केले. गेली काही दिवस मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासह अन्य मागण्यांसाठी अनेकदा बेमुदत उपोषण केले होते. या उपोषणाचा त्यांच्या शरीरावर परिणाम झाल्याने त्यांची तब्येत अचानक बिघडली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी काल बोलताना म्हटले होते की, सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात खोटा अजेंडा राबवल्याने धनंजय मुंडे यांना या प्रकरणात सह आरोपी केले नाही, यात मुंडेंना शिक्षा झाली असती मात्र राजकीय मित्राला वाचवले, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. सोईस्कर पद्धतीने हे प्रकार संपविले राजकीय लोकांची राजकीय मैत्री जागी झाली आणि ही मैत्री जागी झाली की सर्वसामान्य जनतेला अन्याय सहन करावा लागतो.बडा नेता कोण हे न्यायालयाच्या पटलावर हा विषय आला की बड्या नेत्याला फोन केला मात्र सरकारने नेता वाचविला. या नेत्याचा हात शंभर टक्के आहे. सरकारने गुंड मित्र वाचविला. असा आरोप जरांगे यांनी केला. आता बीडमध्ये खून, खंडणी, जमीन बळकविण्याचे प्रकार घडल्यास यांच्या टोळीला सुट्टी नाही. छुपा राजकीय अजेंडा चालवून गुंड आणि राजकीय मित्र वाचवला. मात्र तुमच्या पक्षाचा प्रमाणिक सरपंचाला न्याय देऊ शकला नाही. सरकारच्या प्रतिनिधींनी पद्धतशीरपणाने त्यांचे राजकीय गुंड मित्रासह टोळीही वाचवली. मात्र पुढील तपासात काही सहआरोपी होतात पाहू. मात्र न झाल्यास पुढील काळात त्रास देणाऱ्या टोळीविरोधात आमची मोहिम असेल.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ मार्च २०२५


## समृद्धी इंग्लीश मिडीयम स्कुलचे वार्षिक स्नेह संम्मेलन उत्साहात संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील भुयार चिंचोली /काटेवाडी येथे दिशा शैक्षणिक व सामाजिक बहुउद्देशीय संस्था, उमरगा संचलित समृद्धी इंग्लिश मिडीयम स्कूलचा वार्षिक स्नेह संमेलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी नर्सरी, एलकेजी युकेजी, पहिली ते चौथीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांची मने जिंकली. यावेळी विविध प्रकारचे अभिनव करून विविध गाण्यांवरती नृत्य सादर करताना श्रोत्यांनी मनमुराद आनंद लुटला. प्रारंभी वार्षिक स्नेहसंमेलनाचे दिपप्रज्वलन उमरगा श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील यांच्या हस्ते उद्घाटन शुक्रवारी (ता. २७) रोजी करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते भूमिपुत्र वाघ होते. यावेळी प्रमुख अतिथी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्षप्रा. डॉ. महेश मोटे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा उपाध्यक्ष रेखाताई पवार, मुख्याध्यापिका प्रियंका गायकवाड, श्रीमती सत्यभामा गायकवाड, जेष्ठ पत्रकार मारुती कदम, तानाजी मालुसरे यांची तेरावी वंशज कु. कुमकुम मालुसरे, माजी सरपंच रणजीत गायकवाड, उपसरपंच प्रमोद गायकवाड, रमेश बिराजदार, आजरोद्दीन तांबोळी, राहुल थोरात, संतोष कलशेट्टी, धनराज पवार, संस्थेचे सचिव विकास गायकवाड, पत्रकार शरद गायकवाड, विश्वास सोनकांबळे, विशाल देशमुख, अमोल कटके आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. सचिन शिंदे, विकास (दाजी) सूर्यवंशी, बाळासाहेब माने, माजी सैनिक भानुदास दूधभाते, अप्पू ढगे, रवी लोहार, देवानंद माने, माजी उपसरपंच श्याम घोसले, दिगंबर सूर्यवंशी, विशाल सोमवंशी, संतोष गोस्वामी आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक उपप्राचार्य रावसाहेब बनसोडे यांनी केले.प्रसंगी पाहुण्यांचे स्वागत व सत्कार समृद्धी इंग्लिश मिडीयम स्कुलचे संस्थापक तथा मुख्यप्रवर्तक विकास गायकवाड यांनी केले.

या वेळी प्रमुख अतिथी रेखाताई पवार, प्रा. डॉ. महेश मोटे, भूमिपुत्र वाघ आदींची विशेष मनोगते झाली. विनायकराव पाटील यांनी विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून या संमेलनाला शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी विशेष विविध गुणदर्शनच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या स्नेह सम्मेलनात मराठी-हिंदी सह कोळीगीत, लोकगीत, लावणी, भक्ती-भावगीते, भिमगीत, चित्रपटगीत, बालगीत, देशभक्तीपर गाण्यावर आगदी सुंदर नृत्य सादरीकरण करत चिमुकल्यांनी पालकांची मने जिंकली. याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब बनसोडे तर आभार कु. समृद्धी गायकवाड हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका सुवर्णा बनसोडे राणू जाधव, स्वाती राठोड, कु. आकांक्षा गायकवाड शिक्षकेत्तर कर्मचारी रिहाना मकबूल शेख, सोमशंकर स्वामी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील व पंचक्रोशीतून विविध क्षेत्रातील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन



**उमरगा :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रीय युवक काँग्रेस धाराशिव जिल्हा अध्यक्ष मा. अश्लेश शिवाजीराव मोरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवारी दिनांक ०५ रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी या रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले आहे.मा. अश्लेश भैय्या मोरे हे शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्ये नेहमी सक्रिय असतात. परिसरातील सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने बुधवार दिनांक ०५ रोजी सकाळी १० वाजता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी जया ह्युंदाई, लातूर, बजाज क्ले. लि. हुमनाबाद, आदित्य बिर्ला फायनान्स लि., एचडीएफसी बँक, ॲक्सिस बँक, एन एम सी कंपनी चाकण, एम. के. इंडस्ट्रीज हुमनाबाद अशा ६० पेक्षा अधिक नामवंत कंपण्यामध्ये सुमारे २००० रिक्त पदांवर भरतीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहे. या रोजगार मेळाव्यातून तरुणांना १०,००० ते ९०,००० रुपये पगार पर्यंतच्या नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. परिसरातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, बी ई, एम ई, आणि पदवीधर तरुणांनी या रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून रोजगाराची संधी प्राप्त करावी असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले आणि प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. सूर्यकांत रेवते यांनी केले आहे.

## लातूर-नांदेड महामार्गावर एसटीचा भीषण अपघात

**लातूर :** लातूर-नांदेड महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. एका दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात एसटी महामंडळाची बस उलटल्याची घटना सोमवारी दुपारी १.४३ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या अपघातात ३६ प्रवासी गंभीर जखमी झाले असून ५ जण अंत्यवस्थेत असल्याची माहिती समोर आली आहे. ही दुर्घटना नांदगाव पाटीजवळ घडली आहे. अपघातातील जखमींना तातडीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.एसटी बसचा हा अपघात अतिशय भीषण होता, या भीषण अपघातात बसमधील ४८ प्रवाशांपैकी ३६ प्रवाशांना जबर मार लागा आहे. त्यापैकी, ५ जणांची प्रकृती अंत्यवस्थ आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर उपचार सुरू असून याची माहिती नातेवाईक व कुटुंबीयांना देण्यात आली आहे. या अपघातात दोन प्रवाशांचे हात कोपऱ्यापासून तुटल्याचे देखील समोर आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलिस व जिल्हा प्रशासनाने अपघाताची दखल घेत मदत व बचावकार्य सुरू केले. अपघात जेव्हा झाला तेव्हा येथील स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली व जखमींना बसमधून बाहेर काढण्यास मोठी मदत केली आहे. तसेच रुग्णवाहिका व पोलिस प्रशासनाला या घटनेची माहिती देण्यासही स्थानिकांनी मदत केली. त्यामुळे तातडीने बचावकार्य सुरू होण्यास मोठी मदत झाली आहे.

एक दुचाकी रस्त्याच्या बाजूने रास्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना मागून आलेल्या एसटी बसने या दुचाकीला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र दुचाकीला वाचवण्याच्या प्रयत्नात ही बस रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जाऊन थेट पलटी झाली. हा अपघात अत्यंत भीषण होता. अपघाताचा व्हिडिओ सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ मार्च २०२५



"झालेत बहू, होतीलही बहू, पण तुमच्यासारखा होणे नाही...एक हात पाठीवर असावा, एक शब्द मार्गदर्शनाचा असावा, याच अपेक्षेत आयुष्य जगताना, आज तुमची अधिकच उणीव जाणवते.आमचे आदर्श, आमचे बळ, आणि संकटातही न डगमगणारा आधार...बाबांच्या ११व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या अजरामर स्मृतीस विनम्र अभिवादन व कृतज्ञ श्रद्धांजली.तुमच्या शिकवणीचा प्रकाश पावलोपावली मार्गदर्शन करत राहो, हीच प्रार्थना."

## राजधर्म विकास प्रबोधिनीचे संस्थापक स्व. जयप्रकाश माने यांच्या पुण्यतिथी निमित्तानं विनम्र अभिवादन !



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात राजधर्म विकास प्रबोधिनीचे संस्थापक स्व. जयप्रकाश माने यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने स्व. जयप्रकाश माने यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आदरांजली वाहिली. तसेच या निमित्ताने विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बी. जे. पहिलवान व सहशिक्षक श्री. लक्ष्मण कुऱ्हे यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्री. रमाकांत छडीदार यांनी केले. या वेळी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# फुले शाहू आंबेडकरराईट स्टडी सर्कलच्या वतीने वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त "तुम्हाला गुलामाप्रमाणे राहावयाचे आहे की स्वतंत्र माणसाप्रमाणे जगावयाचे आहे?" या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर ९६ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा २६ फेब्रुवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी.बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाज जीवनात आवश्यक प्रशिक्षित मानवीय संसाधने निर्माण करण्यासाठी आपल्या कार्यशाळांचे आयोजन करून अंमलबजावणी सुरू आहे. ही प्रशिक्षित मंडळी कुठल्याही पक्ष, संघटन, संस्थेत कार्यरत राहिली तरी आपली योग्य भूमिका पार पाडतील. भारत बौद्धमय करण्यासाठी या देशातील सर्व नागरिकांना "भारताचे संविधान" संविधान पालन करण्यास लायक बनविले पाहिजे. जेणेकरून त्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून समतेच्या पातळीवर एकत्र आणले पाहिजे. करिता समाज जीवनात बुद्धिष्ट सेमिनरी चालविली पाहिजे. ज्यात सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास केल्यावर पुढे येणाऱ्या सामायिक मानवतावादी तत्वांना स्विकारून आचरण करणे म्हणजे सारा भारत बौद्धमय करणे होय. यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

समाजाची जी काही दयनीय अवस्था होत चालली आहे त्याचे कारण समाजातील डॉक्टर, वकील, इंजिनिअर व तत्सम उच्चाधिकारी या समाजावर होणा-या अन्यायाच्या विरोधात आवश्यक असणारी प्रतिकार शक्ती न होऊ शकल्याने ही स्थिती ओढवली आहे. तरी त्या चळवळीच्या लाभार्थ्यांनी आपली भूमिका पार पाडली तर या समाजाला गुलामाप्रमाणे राहावयाची वेळ येणार नाही. जय भीम म्हणताना बल भीम ची जाणीव ठेवून जयभीम मध्ये किती बल, शक्ती आहे? यांची समाजाला जाणीव करून दिली पाहिजे. जेणेकरून आपणास स्वतंत्र माणसाप्रमाणे जीवन जगता येईल. करिता उच्च कोटीचे शिक्षण घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी सांगितलेल्या सर्व उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. म्हणजे १ मार्च १९३६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारलेल्या प्रश्नांचे निर्मूलन केल्यासारखे होईल. म्हणून आपण आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या काळातील म्हणजे १ मार्च १९३६ च्या "तुम्हाला गुलामाप्रमाणे राहावयाचे आहे की, स्वतंत्र माणसाप्रमाणे जगावयाचे आहे? या विधानाच्या ८९ व्या वर्धापनदिनानिमित्त समाज जीवनात चर्चा करीत आहोत.

या कार्यशाळेला उदघाटन पर मार्गदर्शन करताना इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, कुलाबा उत्तर व ठाणे दक्षिण या दरम्यान पनवेल येथे ही परिषद संपन्न झाली होती ज्यात आर्थिक दारिद्रय, असहाय्यतेची जाणीव, मनोदौर्बल्याचे खच्चीकरण यावर भर देण्यात आला होता. आपण दारिद्रयात असल्यामुळे जातीच्या आधारावर भेदभाव केला जात होता. त्यांना वाळीत सुद्धा टाकले जायचे म्हणून धर्मांतर केले पाहिजे यावर बाबासाहेब ठाम होते. करिता उच्च राहणी उच्च विचार याचा स्विकार करून लोकांना दैववादापासून परावृत्त केले पाहिजे. साडी-माडी-गाडी या मोहपाशातून बाहेर पडले पाहिजे.

प्रमुख वक्ते प्रा. भीमराव जाधव म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला येवला मुक्कामी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेच्या पूर्ततेसाठी आयोजित परिषदेत बाबासाहेब आंबेडकरांनी हा संदेश दिला होता. जो धर्म माणसाला माणूसकीने वागवत नाही त्याला धर्म कसे म्हणावे? म्हणून हिंदू धर्म सोडणे अगत्याचे झाले होते. या देशातील मूलनिवासी असूर हे बलवान होते ज्यांचे आपण वंशज आहोत. शूद्र व स्त्रियांनी कसे वागावे याची नियमावली मनुस्मृतीत अंतर्भूत आहे. ती मनुस्मृती २५ डिसेंबर १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाळली. भूतकाळात शूद्रातिशूद्रांवर जी बंधने होती, ती आजही आहेत मात्र स्वरूप बदलले आहे.

याप्रसंगी मिलिंद बागूल म्हणाले की, ज्या काळात आपल्या सावलीचा विटाळ सुद्धा सहन होत नव्हता. त्या काळात ज्यांच्या कडे लंगोट सुद्धा बदलण्याची परिस्थिती नव्हती अशी दोन हजार माणसे एकत्र आली होती. टी. एन. थोरात म्हणाले की, एम. के. स्टॅलिन यांनी त्यांच्या राज्यात नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याचे नाकारले याचे स्वागत करून बौद्ध गया येथील महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा दिला. प्रवीण जमधाडे म्हणाले की, आपण धम्म स्वीकारला असला तरी अंगवळणी पडलेली गुलामी सोडली नाही. भिमराव मेश्राम म्हणाले की, फार मोठ्या पदावर असणारी माणसे सुद्धा संघटीत नसल्याने एकमेकांचे पाय ओढण्यात अग्रेसर आहेत. महादेव डांबरे म्हणाले की, एखादी ग्रामपंचायत मुस्लिमांना व्यवसाय करण्यास बंदी कशी काय आणू शकते? प्रतीक पंचशील म्हणाले की, १४ ऑक्टोबर १९५६ च्या धम्म दीक्षेला पाच लाख दलित मानवतेचा महासागर लोटला होता.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक एड. विलास रामटेके व मिलिंद बागूल यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी छाती ठोक हे सांगू जगाला, असा विद्वान होणार नाही. हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, महादेव डांबरे, टी. एन. थोरात, प्रा. भीमराव जाधव, भीमराव मेश्राम, प्रवीण जमदाडे, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ मार्च २०२५


## तिच्यावरच घरातील सगळे प्रेम करतात:५ वर्षीय बहिणीला १३ वर्षांच्या भावाने संपवले




**मुंबई** : मुंबई येथील नालासोपारा येथे अत्यंत हदयद्रावक घटना घडली आहे. एका ५ वर्षीय चिमुकलीची तिच्याच १३ वर्षीय आत्येभावाने खून केल्याची घटना समोर आली आहे. आपल्या लहान बहिणीवरच घरातील सगळे प्रेम करतात, या ईर्षेपोटी ही हत्या करण्यात आल्याचे समजते. १३ वर्षीय भावाने आपल्या ५ वर्षीय चिमुकल्या बहिणीचा गळा दाबून व डोक्यात दगड घालून हत्या केल्याचे उघड झाले आहे.

या प्रकरणी मोहम्मद सलमान मोहम्मद रमजान खान यांनी फिर्याद दिली आहे. अधिकची माहिती अशी की, मोहम्मद सलमान मोहम्मद रमजान (वय ३३) हे नालासोपारा येथील श्रीराम नगर येथे राहतात. त्यांना दोन मुली असून, त्यांची धाकटी मुलगी शिद्राखातून ही ५ वर्षांची होती. शनिवारी शाळेतून घरी आल्यानंतर सायंकाळी बाहेर खेळत असताना अचानक बेपत्ता झाली होती. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला मात्र ती कुठेच सापडली नाही.

सर्वत्र शोधाशोध करून अखेर परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता खान यांचा १३ वर्षीय भाचा शिद्राखातून हीला घेऊन जाताना दिसला. त्याला या प्रकरणी विचारले असता, दोन अज्ञात व्यक्तींनी शिद्राखातूनची हत्या केल्याची खोटी माहिती दिली. कुटुंबीयांनी थेट रात्री साडेअकराच्या सुमारास पेल्हार पोलिस स्टेशन गाठले. पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली असता त्यांना शिद्राखातून हिचा मृतदेह आढळून आला.

पोलिसांनी १३ वर्षीय भाच्याची चौकशी केली असता, त्याच्या जबाबात विसंगती आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी अधिक कसून चौकशी केली तेव्हा त्याने गुन्ह्याची कबुली दिली. संपूर्ण कुटुंब शिद्राखातूनवर विशेष प्रेम करत होते. तिच्यावर होणारा लाड बघवत नसल्याने आरोपी भावाने तीचा डोंगरात नेऊन गळा दाबला आणि त्यानंतर डोक्यात दगड घालून तिचा जीव घेतला, असे समोर आले आहे.

दरम्यान, पोलिसांनी विधी संघर्ष बालकाला ताब्यात घेतले असून, सोमवारी त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर केले जाणार आहे. पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी ही माहिती दिली. या घटनेमुळे कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

## देवाभाऊ यांचे डोहाळे पुरवाच : चित्रा वाघांकडून जितेंद्र आव्हाडांचा बेड्या घातलेला फोटो पोस्ट करत फडणवीसांकडे मागणी



**मुंबई** : महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज दणक्यात सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. जितेंद्र आव्हाड हे हातामध्ये बेड्या घालून विधिमंडळ भवनात दाखल झाले होते. यावरून भाजपच्या आमदार चित्रा वाघ यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत देवेंद्र फडणवीसांकडे एक मागणी केली आहे. देवाभाऊ यांचे डोहाळे पुरवाच अशी पोस्ट करत वाघ यांनी जितेंद्र आव्हाडांना अटक करण्याची अप्रत्यक्षपणी मागणी फडणवीसांकडे केली.

विधिमंडळ अधिवेशनात जितेंद्र आव्हाड हातकड्या घालून आल्याने विधानभवनात याची चांगलीच चर्चा रंगली. राज्यात व देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असून, त्याचा निषेध करण्यासाठी आपण हातात बेड्या घालून येथे आल्याचे आव्हाड या प्रकरणी म्हणाले. या बेड्या या अत्याचाराचे प्रतिक आहेत. मुलभूत अधिकार शाबूत राहावेत यासाठी या बेड्या मी घातल्याचे आव्हाड म्हणाले होते.

जितेंद्र आव्हाड यांचा हातातील हातकडी दाखवतानाचा फोटो भाजपच्या आमदार चित्रा वाघ यांनी सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री कार्यालयाला टॅग करत 'देवाभाऊ, यांचे डोहाळे पुरवा. देवाभाऊ, यांचे डोहाळे पुरवाच', असे म्हटले आहे. या पोस्टनंतर चित्रा वाघ यांनी अप्रत्यक्षपणे जितेंद्र आव्हाडांना अटक करण्याची देवेंद्र फडणवीसांकडे मागणी केल्याची चर्चा सुरू झाली आहे.

# आरोग्य विभागातील कोणत्याही कामांना स्थगिती नाही



**मुंबई** : तानाजी सावंत यांनी आरोग्य मंत्री असताना मंजूर केलेल्या आरोग्य विभागाच्या ३ हजार २०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती देवेंद्र फडणवीसांनी स्थगिती दिल्याची चर्चा होती. मात्र, आता चर्चांवर तानाजी सावंत यांनी स्पष्टीकरण दिले आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आरोग्य विभागाच्या कामांना कोणत्याही पद्धतीने स्थगिती दिलेली नाही, असे तानाजी सावंत यांनी म्हटले आहे. घोटाळा झाल्याचा आरोप झाला, पण सरकारच्या तिजोरीतून एक रुपयाही कुठे गेलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या विधिमंडळाचे अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांनी अशिवेशनाला हजेरी लावली. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. आरोग्य विभागाच्या कामांच्या स्थगितीबद्दल प्रश्न विचारला असता त्यांनी उपरोक्त स्पष्टीकरण दिले. तसेच जितेंद्र आव्हाड यांच्यावरही निशाणा साधला.

गेल्या दोन दिवसांपासून कामांच्या स्थगितीबाबत जो विषय सुरु आहे, त्या विषयाची माहिती घेणे गरजेचे आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी मी चर्चा केली. अशा कोणत्याही गोष्टीला मंत्रिमंडळाने किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिलेली नाही. आता ३ हजार १९० कोटींचा घोटाळा झाला, त्याआधी १०८ गाड्यांच्या बाबतीत १० हजार, १२ हजार कोटींचा घोटाळा झाला असे आरोप झाले. मात्र, यामध्ये महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीतून एक रुपयाही कुठे गेलेला नाही. पण आभासी जगात जगायचे आणि घोटाळे झाले म्हणायचे. एखाद्याला बदनाम करायचे हे चुकीचे आहे. मी आरोग्यमंत्री असताना न भूतो न भविष्यति असे तब्बल २४ महिन्यांत ४२ निर्णय आरोग्य विभागात घेतले आहेत, असे तानाजी सावंत म्हणाले.

माझ्या कार्यकाळात अनेक चांगले कामं केली. ७० कोटींत महाराष्ट्रातील २५०० हजार हॉस्पिटल साफसफाई करणे सोपे होते का? वैद्यकीय विभागाची ऑर्डर झाली होती. माझ्या खात्याने ८४ रुपये पर स्क्वेअरफुटने ठरवले. हायकोर्टात आपलेच काही लोकं गेली. १२ लोकांनी कॉम्पिट केले, वर्क ऑर्डर झाली, एमओयू झाले, महाराष्ट्र शासनातील एक रुपयाचाही कॉंट्रॅक्ट दिले. हॉस्पिटल मध्ये येणारा रोजंदारी करणारा वर्ग आहे. मोफत उपचार सुरू केले. अडीच हजार हॉस्पिटल स्वच्छता ही ७० कोटीत शक्य आहे का? असा सवालही तानाजी सावंत यांनी यावेळी विचारला.

शासन म्हणून धोरणात्मक निर्णय घेण आमचे काम असते. टोटल टेंडर १२ हजार कोटींचा असेल तर १२ हजार कोटी म्हणायचे. कुठेही एक रुपया खर्च झाला नाही. हायकोर्टाच्या आदेशाने निर्णय होईल सांगितले. कुत्रा चावतो तर कुत्र्याला चावायचे का? मी कालही म्हटले होते संजय राऊतला मेंटल हॉस्पिटल मध्ये एक जागा रिक्त ठेवली. मी आजही सांगतो, प्रकाश आबिटकरांनी एक सीट ठेवावी, अश शब्दांत तानाजी सावंत यांनी संजय राऊतांवर टीका केली.

तानाजी सावंत बँकॉकला जाणाऱ्या मुलासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा कामाला लावली होती. यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर तोंडसुख देखील घेतले. याबाबत तानाजी सावंतांना प्रश्न विचारला असता, कायदेभंग असेल तर कायदेशीर कारवाई चालू करावी. वडील म्हणून, मला जो निर्णय घ्यायचा होता, तो घेतला. सगळ्यांकडून विनंती केली आहे, असे ते म्हणाले. जितेंद्र आव्हाड जर माझ्या जागेवर असते तर त्यांनीही तेच केले असते. मी पॅनिक झालो होतो, माझा परिवार पॅनीक झाला होता, असे तानाजी सावंत म्हणाले.

आरोग्य विभागाच्या कामांच्या स्थगितीबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, आरोग्य विभागाच्या बाबतीत केंद्र सरकारने जे काही पैसे आपल्याला दिले होते, त्यामध्ये आपण जे काही कामे सुचवली होती, त्या कामांमध्ये ९ टक्के पैसा खर्च केला होता. त्यावर केंद्र सरकारचे म्हणणे होते की, तो पैसा ५ टक्के केला पाहिजे. त्यामुळे केंद्र सरकारने हे आपल्याला कळवले. त्यानुसार संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी आणि सचिवांनी माहिती मागवली की, कोणती कामे प्रायोरिटीने करायची. पण अशा पद्धतीची फाईल माझ्याकडे आलेली नाही आणि मी त्यावर कोणतीही स्थगिती दिलेली नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ मार्च २०२५


# पकडला तो चोर ... कत्तल होणारी गायच दोषी कसाई मात्र निर्दोष... आता हा शिक्षण विभागातील सुद्धा आका...!



कॉपीमुक्त अभियान शिक्षण मंत्री मा. दादासाहेब भुसे साहेब यांनी जाहीर केले, जाहिरातबाजी देखील झाली,10वी, 12वीच्या परीक्षा सुरू झाल्या. परीक्षा केंद्रावर शिक्षण विभाग आणि महसूल विभागाच्या भरारी पथकाने धाडी टाकल्या आणि कॉपीमुक्त अभियानाचे धिंडवडे निघाले वर्तमानपत्राची पाने भरभरून अनेक किस्से उजेडात आली, शासनाच्या कॉपीमुक्त अभियानाची खरी पोलखोल उघडं झाली. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. याची चर्चा होणे अत्यावश्यकच म्हणून हा लेख....... शेवटी शासनाच्या कॉपीमुक्त अभियानाचे तीनतेरा वाजवणारे आहे तरी कोण ?1) उच्च माध्यमिक विद्यालय /कनिष्ठ महाविद्यालय क्षमतेपेक्षा अधिक खुप अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित करणारे अधिकारी आहे तरी कोण ???यामध्ये विशेष हे आहे की हे विद्यार्थी संख्या नियमित करताना जिल्ह्यातील विद्यार्थी आहेत की बाहेरच्या जिल्ह्यातील हे कोण ठरवणार हे विद्यार्थी शासन निमाच्या वयानुसार आहेत का हे सर्व नियमित आणि मान्य करणारे अधिकारी आहे तरी कोण ????2) परीक्षा केंद्राची मान्यता देताना भौतिक सुविधा यांची खातरजमा करण्याची जबाबदारी आहे तरी कोणाची ???3) स्वयं अर्थसह्यायित केंद्रांना मान्यता देताना सर्व निकष खरंच पाळले आहेत का हे तपासणारा अधिकारी आहे तरी कोण ????4) स्वयं अर्थसहायित बोटावर मोजता येईल एवढ्याच उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी पदाची मान्यता आहे तरी सुद्धा एकही पदाला वैयक्तिक मान्यता नसताना स्वयं अर्थसहयित केंद्राला मान्यता देणारे अधिकारी आहे तरी कोण ???? 5) शिक्षण विभागातील अधिकारी भरारी पथकात खरंच कॉपीमुक्ती अभियानासाठी कार्य केले का हे तपासणार तरी कोण ???6) भरारी पथकाने कारवाई करताना समानता दाखवली आहे का, की सापडला तो चोर अशी गत.... शिक्षण विभागातील आकाच्या इशाऱ्यावर कामकाज करत आहेत का ?????7) भरारी पथकाने कारवाई केलेल्या सर्व परीक्षा केंद्रावर एक कारवाई आणि शिक्षण विभागातील अधिकारी असलेल्या संस्थाचालकावर वेगळी कारवाई का ?????8) रातोरात पर्यवेक्षक संपूर्ण यादीच बदलली जाते हि खरंच कमाल आहे की नाही !!!!9) स्वयं अर्थसहाय्यित परीक्षा केंद्रावर बंद खोलीत झेरॉक्स मशीन स्कॅनर आढळून आले, सचिव परिक्षा केंद्रावर परीक्षा काळात उपस्थित राहून देखील संस्थाचालक (सचिव) निर्दोष कसा ???? इथे नियमात कसे बदल झाले असतील की केले गेले आकाच्या सांगण्यावरून ????? हे गुलदस्त्यात आहे 10) एकाच स्वयं अर्थसहायीत परीक्षा केंद्रासाठी कोणी बदलले का बदलले ??11) हो या परीक्षा केंद्रावर फक्त गरीब बिचाऱ्या संस्थाचालकाचा आदेश शिरसंवाद मानणाऱ्या गुरुजींवर मात्र गुन्हे दाखल झाले आहेत. 12) या संस्थाचालकांना नेमका कोणाचा आशिर्वाद आहे की शिक्षणक्षेत्रातील हे आका आहे हे सर्वांना कळणे गरजेचे आहे नाहीतर शिक्षक जे नौकरी वाचवण्यासाठी संस्थाचालकाचे आदेश पाळणारे आहेत ते आहेतच बळीचे बकरे ......... छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्यातील राजधानी चे शहर आहे म्हणून जे इथे होते ते संपूर्ण मराठवाड्यात झिरपते या सर्व प्रकरणात अर्थाशिवाय अशक्यच आहे हे सर्वश्रुतच आहे पण यामध्ये सुद्धा दोन प्रकार आहेत एक अर्थासाठीच कार्य करणारे आणि दुसरे दिलेल्या आदेशाचे , अर्थाशिवाय, कोणताही प्रश्न न विचारतां पालन करणारे बिचारे गुरुजी अशा प्रकारे गुरुजीचा सर्वच बाजूने सँडविच केला जातो म्हणजेच पुन्हा समाजात चर्चा होते ती शिक्षकाचीच सरकार शिक्षण विभागातील वरिष्ठ पातळीवरील अधिकारी दखल घेवून कार्यवाही करतील का ??शिक्षण हे समाजाभिमुख आणि स्वच्छ आणि भ्रष्टचार मुक्त होणे गरजेचे आहे शिक्षण फक्त परीक्षेपुरते झाले तर हा समाज आणि येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही.


**भाई चंद्रकांत चव्हाण**
**९८९०५७८७५१**
**मराठवाडा शिक्षक संघ**
**छत्रपती संभाजीनगर.**


## छाया माळवाल यांना राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार जाहीर



**कन्नड (अरुण थोरात):** महाराष्ट्र शिक्षक पॅनल पुरस्कृत राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कारासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टापरगाव ता.कन्नड शाळेच्या सहशिक्षिका छाया बाळकृष्ण माळवाल यांची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून निवड करण्यात आली आहे.

हा पुरस्कार सोहळा दि. १८ मे रोजी कोल्हापूर येथील सायबर कॉलेज हॉल मध्ये संपन्न होणार आहे. यासाठीचे निवडपत्र दि. ०१मार्च रोजी महाराष्ट्र शिक्षक पॅनल चे राज्याध्यक्ष दीपक चामे व राज्य सचिव सतीश कोळी, राज्य समन्वयक विकी येलमटे, गोपाल भुतापल्ले, रामसिंग महाजन तसेच जिल्हा समन्वयक मनिषा पाटील यांच्या हस्ते छाया माळवाल यांना देण्यात आले.पुरस्कार निवडीबद्दल हतनूर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री आहेर, श्री.कल्याणकर यांनी विशेष अभिनंदन केले.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा बाबुलाल पाटील, सहशिक्षिका वर्षदा अनिल आवाळे, माधवी गोंडाणे , स्वप्ना सोनवणे, भावना शिंदे यांनी श्रीमती माळवाल यांचे पुरस्कार निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

## जि.प. प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिन साजरा






**वैजापूर :** आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पानव खुर्द येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी वैजापूर तालुक्यातील केशर कादंबरीकार, कवी तसेच ज्येष्ठ शिक्षक संजय जाधव सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. देवदत्त सोनवणे आणि साईराज तुरकणे या विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या संक्रांत आणि दिवाळी या कविता याप्रसंगी सादर केल्या. तसेच सरांनीही काव्य लेखन कसे करावे हे उदाहरणासह स्पष्ट केले. प्रसंगानुरूप सुंदर असे फलक लेखन श्रीमती जयश्री गायकवाड यांनी केले. सुयोग बोऱ्हाडे आणि जयश्री गायकवाड यांच्या कल्पनेतून साकारलेल्या 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमाच्या उत्साहाने विद्यार्थ्यांनी काव्य आणि लेखन करण्याचा निश्चय केला. लवकरच पानव खुर्द शाळेचा काव्यसंग्रह तयार होणार आहे.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण देवरे शिक्षिका सारिका मांडुडे, पुष्पा चौधरी, रुपाली सत्रे इ. उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002